मुख्य लेखा व वित्त विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक :- ४४४
दिनांक :- ११/०५/२०२१

## कार्यालय परिपत्रक

पुणे महानगरपालिकेच्या सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी वित्तीय उपाय योजना करण्यासाठी प्रशासकीय स्तरावर वित्तीय समिती गठीत करण्यात आलेली आहे. पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्यांकडून त्यांच्याकडील विविध विकास कामे, देखभाल दुरुस्ती, स्पीलची कामे, भांडवली कामे इत्यादी कामांबाबतचे प्रस्ताव/निवेदन वित्तीय समितीकडे मान्यते साठी सादर करण्यात आले आहे. खात्याने सादर केलेल्या प्रस्तावानुसार सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षांसाठी मान्य तरतूद अथवा खात्याला विविध विकास कामांसाठी आवश्यक लागणारी तरतूदींना मा. वित्तीय समितीने मान्यता दिलेली आहे. तथापि आमच्या निदर्शनास असे दिसून आले आहे की, मान्य झालेल्या तरतुदीचे विभाजन करुन जाहिरात, टेंडर, इ. देण्यात आलेली आहेत. ही बाबी नियमबाह्य आहे. अशा प्रकारे देण्यात आलेल्या विविध कामांच्या जाहिरात, टेंडर, इ. रद्द करण्यात याव्यात. तसेच यापुढेही मा. वित्तीय समितीकडून मान्यता देण्यात येणाऱ्या विविध कामांच्या तरतुदीचे विभाजन करुन जाहिरात, टेंडर इ. देण्यात येऊ नये याबाबत सर्व खातेप्रमुख/उप आयुक्त/सहाय्यक महापालिका आयुक्त यांनी दक्षता घेऊन संबंधीत अधिकारी/सेवकांना याबाबत अवगत करावे.

कळावे

Rubal 11/5/21
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत :-१) मा.सर्व खातेप्रमुख
२) मा.सह महापालिका आयुक्त /मा.उप आयुक्त (क्र.१ ते ५)
३) मा.महापालिका सहायक आयुक्त, क्षेत्रिय कार्यालय क्र.१ ते १५
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस माहिती व पुढील कार्यवाहीसाठी -----